# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल तक्रार**

**रामाआ - तक्रार क्र. बीएम - ६२६ /२०१८**

**तक्रारकर्ता - श्री. ज्योतीराम शंकर शेडगे,**
आकाऐश स्ट्रडीओ, पटेल इस्टेट, जयप्रकाशनगर रोड नं.२
गोरेगाव (पूर्व) मुंबई -४०० ०६३.

***विरुद्ध***

**जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२ (अभिलेख)**
सह जिल्हा निबंधक वर्ग-२ (अभिलेख) यांचे कार्यालय,
म्हाडा इमारत, रुम नं.१३, तळमजला, कलानगर, वांद्रे (पूर्व) मुंबई -५१.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २१.०१.२०२०**

तक्रारकर्ता : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

| आयोगाच्या द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | तक्रारीचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याकडून अहवाल मागविण्यात आलेल्या पत्राचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याकडून प्राप्त झालेल्या अहवालाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १२.०९.२०१८ | २०.[illegible].२०१८ | २८.०५.२०१९ | १३.०६.२०१९ |

तक्रार अर्जाच्या सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ते अनुपस्थित आहेत. या प्रकरणी कोणतेही आदेश पारीत करण्यापूर्वी तक्रारकर्त्यांचे मत जाणून घेणे आवश्यक असून या प्रकरणावर सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख स्वतंत्र रीत्या कळविण्यात येईल.

मुंबई
दिनांक : २१.०१.२०२०

State Information Commission Greater Mumbai

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ६२६/२०१८**

**तक्रारकर्ता श्री. ज्योतीराम शंकर शेडगे**

**सुनावणी दिनांक : ०७.०५.२०२४ (In continuation of order dt २१.०१.२०२०)**

सदर प्रकरणी यापुर्वी तक्रार सुनावणी दि. २१.०९.२०२० रोजी आयोजित केली होती. त्यावेळी तक्रारकर्ता अनुपस्थित होते. त्यांचे मत जाणून घेण्यासाठी सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती.

आजच्या सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग- २ (अभिलेख) मुंबई उपनगर जिल्हा उपस्थित असून त्यांनी त्यांचे निवेदन दि. ०६.०५.२०२४ आयोगासमोर सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले. त्यामध्ये नमुद केले आहे की, तक्रारदार यांनी मागणी केलेले दस्त क्र. BND/१५२४/१९५८, BND/२०६०/१९६०, BND/१७५३/१९५९ व BND/२०३४/१९६० या दस्तांच्या प्रती प्रमाणित करुन मिळणेबाबत शासकीय छायाचित्रण नोंदणी कार्यालय, पुणे या कार्यालयास यापूर्वीच पत्र पाठविण्यात आल्याचे संगणकीय अभिलेखावरुन दिसून येते. परंतु, सदर कार्यालयाकडून सदर दस्तांच्या प्रमाणित प्रतीबाबत केलेला पत्रव्यवहार या कार्यालयाचे अभिलेखात दिसुन येत नाही.

जन माहिती अधिकारी सादर केलेल्या निवेदनावरुन दिसून येते की, सह जिल्हा निबंधक वर्ग- २ (अभिलेख) यांचे कार्यालय यांचे म्हणणे आहे की, केलेला पत्रव्यवहार अभिलेखात दिसून येत नाही हे योग्य नाही. मा. नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी याबाबत योग्य ती दखल घ्यावी व सदर प्रकरणी पुढील सुनावणीच्या वेळी संबंधीत अधिकारी यांना त्यांच्या लेखी युक्तिवादासह सुनावणीस हजर राहण्याबाबत कळवावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ११.०६.२०२४ रोजी दुपारी ०२.३० वाजता घेण्यात येईल.**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

**मुंबई**
**दिनांक : ०८.०५.२०२४**

**प्रत:- मा. नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक नियंत्रक, नवीन प्रशासकीय इमारत, बंड गार्डन रोड, विधानभवन समोर, पुणे- ४११००१.**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ६२६/२०१८**
**तक्रारकर्ता श्री. ज्योतीराम शंकर शेडगे**
**सुनावणी दिनांक : ११.०६.२०२४ (In continuation of order dt ०८.०५.२०२४)**

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे येथील अधिकारी उपस्थित असून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे निवेदन दि. १०.०६.२०२४ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, तक्रारकर्ता यांनी मागणी केलेल्या ४ दस्तांपैकी दोन दस्त BND/१५२४/१९५८ आणि BND/१७५३/१९५९ उपलब्ध झाले असून ते आयोगासमोर तक्रारकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात आले. उर्वरित दोन दस्त २००५ साली झालेली अतिवृष्टी व त्यांच्या कार्यालयात असलेली कर्मचाऱ्यांची कमतरता यामुळे उपलब्ध होण्यास अजून कालावधी लागत आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी उर्वरित दोन दस्त तक्रारकर्ता यांना ३० दिवसांत उपलब्ध करुन द्यावे.**
**२) तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
12-6-2024.

**मुंबई** **(डॉ. प्रदीप व्यास)**
**दिनांक : १२.०६.२०२४** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission Greater Mumbai